अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,

आस्थापना विभाग, पुणे मनपा.

जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/९६७४

दिनांक :- २७/०६/२०२०

-: आदेश :-

विषय :- कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.
NICMAR, एन.आय.ए. पोस्ट ऑफिस, बालेवाडी व डॉ.नायडू सांसर्गिक रोग रुग्णालय येथे कर्मचारी उपलब्ध करून देणेबाबत.

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५

पुणे शहरामध्ये कोरोना विषाणूचा प्रसार होऊ नये यासाठी कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

त्यानुसार NICMAR, एन.आय.ए. पोस्ट ऑफिस, बालेवाडी, पुणे येथे क्वारंटाईन कक्ष स्थापन करण्यात आला असून तसेच कोरोनाची लक्षणे आढळलेल्या व्यक्तींची प्रामुख्याने डॉ.नायडू सांसर्गिक रोग रुग्णालय या ठिकाणी करण्यात आली आहे. या ठिकाणी प्रशासकीय कामासाठी मदत करण्यासाठी खालीलप्रमाणे **लिपिक टंकलेखक** सेवकांची नियुक्त करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **नियंत्रण करणा-या अधिकाऱ्यांचे नाव व हुद्दा** | **अधिकारी व कर्मचारी नाव, हुद्दा व सध्याचे खाते** | **प्रत्यक्ष कामाचे ठिकाण** |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | डॉ. संजीव वावरे, सहा. आरोग्य अधिकारी | १) श्री.सचिन सुरेंद्र सैबी, लिपिक टंकलेखक, स्थानिक संस्था कर विभाग | डॉ.नायडू सांसर्गिक रोग रुग्णालय |
| २ | श्री. इंद्रभान निवृत्त रणदिवे कार्यकारी अभियंता, प्रकल्प क्र.१ | १) श्रीमती पूनम नितीन धरपाळे, लिपिक टंकलेखक, धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | NICMAR, एन.आय.ए. पोस्ट ऑफिस, बालेवाडी, पुणे |

वरील रकाना क्र. ३ येथील कर्मचारी यांनी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्र.२ येथील अधिकाऱ्यांचे नियंत्रणाखाली रकाना क्र.४ येथील प्रत्यक्ष कामाचे ठिकाणी कामकाज करावयाचे आहे.

वरील सेवकांस या कार्यालयीन आदेशान्वये प्रत्यक्ष कामकाजासाठी नेमून दिलेल्या ठिकाणी हजर होणेकरीता तात्काळ कार्यमुक्त करण्यात येत आहे. यासाठी स्वतंत्र कार्यमुक्ती आदेशाची आवश्यकता नाही. उपरोक्त सेवक नेमून दिलेल्या ठिकाणी हजर न झाल्यास व सदरच्या कालावधीत या कामास नकार देणा-या हलगर्जीपणा करणा-या व्यक्तींविरुद्ध संदर्भ क्र.१ ते ३ चे कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

तसेच, सदर सेवकांचे यापूर्वी आदेश पारित झालेले असल्यास या आदेशान्वये नाव वगळण्यात येत आहे.